कोयना प्रकल्पांतर्गत पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करुन देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः पुनर्व-२०१७/२८८/प्र.क्र.७१/र-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १८/११/२०१७

वाचा -

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र: विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५/५/२००९
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र: संकिर्ण २०११/प्र.क्र.८० (भाग-२)/र-८, दि. २५/०७/२०१३
३) शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२,दि. १७/४/२०१५
४) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अंर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थसंकल्प-३, दि.१८/०४/२०१७
५) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र: आरपीए-२०१५/प्र.क्र.२१४/र-१, दि. २३/०९/२०१५
६) सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र: विअसु-२०१५/प्र.क्र.२१८/इमारती-२, दि. १६/१२/२०१५
७) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. अर्थसं-२०१२/२३२/प्र.क्र. १०६/र-८, दि. २८/०१/२०१४
८) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्र. अर्थसं-२०१२/२३२/प्र.क्र. १०६/र-८, दि. २४/०२/२०१५.
९) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्र. बैठक-२०१७/प्र.क्र.६२/र-८, दि. २८/०९/२०१७
१०) उपआयुक्त (पुनर्वसन), कोंकण विभाग यांचे पत्र क्र: पुनर्वसन/कार्या-२/नागरी सुविधा/०९/२०१७ दि. २०/०९/२०१७

प्रस्तावना -

कोयना प्रकल्पामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांच्या ठाणे व पालघर जिल्हयातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांच्या अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय) यांच्या अध्यक्षतेखाली दि.१९/०९/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त संदर्भाधिन क्र. ९ येथील पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे. सदर बैठकीतील निर्देशानुसार कोयना प्रकल्पांतर्गत पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील कुसवडे नेहाळपाडा, उचाट व तुसे कुसवडे या पुनर्वसित गावांमधील नळ पाणीपुरवठा कामांची रु.५६,६३,३८७/- एवढया रकमेची अंदाजपत्रके उपआयुक्त (पुनर्वसन), कोंकण यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेस्तव शासनास सादर केली होती. तथापि, सदर कामांना संदर्भाधिन क्र. ७ येथील शासन निर्णयान्वये प्रदान प्रशासकीय मान्यता क्र. ८ येथील शासन पत्रान्वये रद्द करण्यात आली असल्याने, सदर कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे शासनाच्या विचाराधिन होते.

२. याबाबत शासन निर्णय वित्त विभाग क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५.५.२००९ अन्वये प्रदान व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२)(अ) अनुसार योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता देण्याबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार, सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना नागरी सुविधा पुरविणे

या योजनेअंतर्गत नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत शासन निर्णय क्र. संकिर्ण २०११/प्र.क्र.८०(भाग-२)/र-८, दि.२५/०७/२०१३ निर्गमित करण्यात आला आहे.

तदनंतर संदर्भाधिन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये वित्त विभागाने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक ते पाच अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा केल्या असून, सदर सुधारणानुसार व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता देण्याबाबत प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार सदर प्रस्तावामध्ये नमूद नागरी सुविधा कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची तसेच बैठकीतील निर्देशानुसार प्रशासकीय मान्यता किंमतीच्या ५० % निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय-

त्यानुसार, कोयना प्रकल्पांतर्गत पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील सोबतच्या विवरणपत्रामध्ये नमूद ३ नागरी सुविधा कामांच्या एकूण रु. ५६,६३,३८७/- (अक्षरी रूपये छप्पन्न लक्ष त्रेसष्ठ हजार तीनशे सत्त्याऐंशी फक्त) रकमेच्या अंदाजपत्रकांस खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र. विअप्र.२०१३/ प्र.क्र.३०/१३/ विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल २०१५ अनुसार वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग तीन अनुक्रमांक ४ परिच्छेद क्र.२७ (२) (अ) अनुसार असलेल्या अधिकारांनुसार, सदर कामांकरिता प्रथम टप्प्यामध्ये रु. २८,३१,६९४/- (अक्षरी रुपये अठ्ठावीस लक्ष एकतीस हजार सहाशे चौ-याण्णव फक्त) एवढा निधी "मागणी क्रमांक सी-१०, लेखाशीर्ष ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प, ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत) (कार्यक्रमावरील खर्च)" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात उपलब्ध तरतूदीतून विभागीय आयुक्त, कोंकण यांना खालील अटींच्या अधिन राहून उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. <u>प्रशासकीय मान्यता अटी:-</u>

१) प्रस्तावात समाविष्ट असलेल्या कामांकरिता गौण खनिज स्वामित्वधनाची वसूली करण्याची जबाबदारी संबंधित कार्यन्वयीन यंत्रणेची राहील.

२) निर्धारित करण्यात आलेल्या भौतिक मानकांनुसार काम करुन घेण्याची जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता यांची राहील.

३) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांवर होणारा खर्च मंजूर अंदाजपत्रकापेक्षा/विहीत मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची संबंधित कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

४) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांसाठीच्या अंदाजपत्रकांत दर्शविलेली कामनिहाय रक्कम तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेनुसार असावी. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेतील अटींचे विहीत कार्यपध्दतीनुसार पालन होईल, याची संबंधित अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५) संबंधित कार्यन्वयन अधिकारी यांनी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ मधील कलम (१८) अन्वये प्रस्तावाधीन नागरी सुविधा सर्व दृष्टीने पूर्ण झाल्यावर व त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून प्रमाणपत्र घेतल्यानंतर संबंधित जिल्हापरिषदेकडे तातडीने हस्तांतरित करावयात.

६) प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांचा उचित दर्जा राखला जाईल, याची कार्यन्वयन यंत्रणेने दक्षता घ्यावी.

३. <u>निविदा प्रक्रिया व कार्यारंभ आदेश :-</u>

अ) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांनी प्रस्तुत प्रशासकीय मान्यता आदेशातील अटी लक्षात घेऊन प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करावी.

ब) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांनी प्रस्तावाधीन नागरी सुविधा कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदा प्राप्त कामांसाठीचे कार्यारंभ आदेश देऊन नागरी सुविधा कामे तात्काळ सुरु करावीत.

४. <u>निधी उपयोजनास्तव वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने अटी:-</u>

१) विभागीय आयुक्त, कोंकण यांनी त्यांना या आदेशान्वये प्राप्त होणारा निधी संबंधित नियंत्रण अधिकारी म्हणून संबंधित अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांचेकडे अर्थसंकल्प वितरणप्रणाली BEAMS द्वारे तात्काळ वितरित करावा.

२) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे यांनी नागरी सुविधा कामांसाठी वितरीत सदरचा निधी विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडून प्राप्त होताच संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडे पतपत्र LOC व्दारे विनाविलंब वितरित करावा.

३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांनी या आदेशान्वये मंजूर निधीतून नागरी सुविधा कामांची देयके अदा करावीत तसेच तदनुषंगाने कार्यपूर्ती अहवाल शासन, विभागीय आयुक्त, कोंकण व संबंधित जिल्हाधिकारी यांना सत्वर सादर करावा.

४) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेला व प्राप्त झालेला निधी मंजूर नागरी सुविधा कामांवरच खर्च करण्यात यावा तसेच सदर निधी खर्च करताना मंजूर केलेल्या अनुदानापेक्षा कोणत्याही परिस्थितीत जास्त खर्च होणार नाही याची कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

५) मंजूर निधी शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय अन्य कामांवर खर्च होणार नाही याची संबंधित कार्यन्वयन अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

६) सदरच्या आदेशातील नमूद मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र.सी-१०, ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प, ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत) या लेखाशीर्षांतर्गत वितरित केलेला कोणताही निधी शिल्लक रहाणार नाही अथवा सदर निधी संबंधित यंत्रणेच्या कोणत्याही Operational Bank Account /PLA (स्वीय प्रपंची खाते) मध्ये जमा करून ठेवण्यात येणार नाही, याची संबंधित यंत्रणेचे अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी दक्षता घ्यावी.

७) मुख्यलेखाशीर्ष मागणी क्र. सी-१०, ४७०१, मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील भांडवली खर्च (००) (०३) इतर प्रकल्प, ५३ मोठी बांधकामे (४७०१-एच-७२७) (दत्तमत) या लेखाशीर्षांतर्गत संबंधित संनियत्रण अधिकारी यांनी होणाऱ्या खर्चाचे स्वतंत्र लेखे ठेवून शासनाच्या प्रचलित लेखा पध्दतीनुसार ते महालेखापाल यांना सादर

करावेत. तद्नुषंगाने या लेखाशीर्षाखाली होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ, विनियोजन लेखे इत्यादि कामे संबंधितांनी प्रचलित पध्दतीप्रमाणे करावीत.

८) यासंदर्भातील खर्च विवरणपत्रे/ अहवाल शासनास न चुकता सादर करण्यात यावीत. वरील निधीसंबंधित खर्च ताळमेळाची विवरणपत्रे महालेखापाल कार्यालयाच्या Reconciliation Slip सह शासनास न चुकता सादर करावीत.

९) संबंधित अधीक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनी या आदेशान्वये वितरीत निधीचे उपयोजन प्रमाणपत्र Utilisation Certificate महालेखापाल कार्यालय, संबंधित जिल्हाधिकारी/ विभागीय आयुक्त/ शासनास तातडीने सादर करावे.

१०) यासंदर्भातील लेखाशीर्षाखाली चालू वित्तीय वर्ष सन २०१७-२०१८ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या अनुषंगाने खर्चाचा विनियोजन लेखा संबधितांनी विहित कालावधीत शासनास सादर करावा.

५. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे यांनी सदर आदेशान्वये प्राप्त निधीच्या अनुषंगाने उपयोजन प्रमाणपत्रासह व कामांच्या प्रगती अहवालासह(Work Progress Report) निधी मागणी सादर केल्यानंतर उर्वरीत निधी " मागणी क्रमांक सी-१० ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावरील भांडवली खर्च (००)(०३) इतर प्रकल्प ४७०१-एच-७२७ (योजनांतर्गत) (दत्तमत)" या लेखाशीर्षातून वितरीत करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१११८१०५५५४३०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f11331 6b4ad736a2c6a66b967f985fda6404a710 d52, cn=Dayanand S Munjale
Date: 2017.11.18 10:58:17 +05'30'

(द.शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) कोंकण विभाग, नवी मुंबई
२. उप आयुक्त (पुनर्वसन), कोंकण
३. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक पालघर
४. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे
५. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत)
७. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१, नागपूर-२ (२ प्रतीत)

८. जिल्हा कोषागार अधिकारी, पालघर
९. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) पालघर
१०. वित्त विभाग, कार्यासन व्यय-१०, अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई-३२.
११. नियोजन विभाग,कार्यासन १४७५, मंत्रालय, मुंबई ३२.
१२. महसूल व वन विभाग, कक्ष अधिकारी ब-१, पी.ए.सी.कार्यासन ,मंत्रालय, मुंबई ३२.
१३. निवडनस्ती कार्यासन र-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

*****

शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र: पुनर्व-२०१७/२८८/प्र.क्र.७१/र-८, दि.१८/११/२०१७ सोबतचे विवरणपत्र

कोयना प्रकल्पांतर्गत पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमधील नागरी सुविधा कामांचा प्रशासकीय मान्यता किंमत व वितरीत निधीचा तपशील

अ क्र	पुनर्वसित गाव	नागरी सुविधा कामाचे नाव	प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये	वितरीत निधी रुपये
१	कुसवडे नेहाळपाडा	नळ पाणीपुरवठा योजना करणे	१५,८४,४२४/-	७,९२,२१२/-
२	उचाट	नळ पाणीपुरवठा योजना करणे	२०,२१,७४८/-	१०,१०,८७४/-
३	तुसे कुसवडे	नळ पाणीपुरवठा योजना करणे	२०,५७,२१५/-	१०,२८,६०८/-
		एकूण	**रु. ५६,६३,३८७/-**	**रु.२८,३१,६९४/-**

Dayanand S Munjale

Digitally signed by Dayanand S Munjale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=831ad18b348f1d88937e4f11331 6b4ad736a2c6a66b967f985fda6404a710d 52, cn=Dayanand S Munjale
Date: 2017.11.18 10:58:37 +05'30'

(द.शं. मुंजाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

*****